दिनांक 17/01/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.131

विषय – विटा नगपरिषदेच्या जन्म - मृत्यु विभागास laptop खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 26/12/2022 ने संगणक अभियंता व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगपरिषदेच्या जन्म - मृत्यु विभागाकडील laptop हा स्वच्छ सर्वेक्षण 2023 कामी नियुक्त केलेल्या सिटी कोऑर्डीनेटर यांना देणेत आलेला आहे. त्यामुळे जन्म - मृत्यु विभागात laptop नसलेने कामे करणेस अडचणीचे आहेत आहे. याबाबत जन्म - मृत्यु विभागाकडून वारंवार मागणी होत आहे.तरी जन्म - मृत्यु विभागास laptop खरेदी केलेस ऑनलाईन कामे करणे तसेच नेमून दिलेले स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधराची कामे करणे सोयीचे होईल. तरी जन्म - मृत्यु विभागास 1 laptop GeM Portal वरून खरेदी करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 17/01/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.132

विषय – सन 2022-2023 या वित्तीय वर्षाकरीता गॅस शवदाहिनी चालविणे तसेच शहरातील मृत प्रेतांचे व सर्व जाती-धर्माच्या कोव्हीड प्रेतांचे अंत्यविधी करणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 01/11/2022 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

सन 2022-2023 या वित्तीय वर्षाकरीता गॅस शवदाहिनी चालविणे तसेच शहरातील मृत प्रेतांचे व सर्व जाती-धर्माच्या कोव्हीड प्रेतांचे अंत्यविधी करणेकामी खालील निविदा दाखल आहेत.

| | कोव्हीड प्रेतांचे अंत्यविधी (प्रति शव) | इतर प्रेतांचे अंत्यविधी (प्रति शव) |
|---|---|---|
| 1) लक्ष्मण यल्लाप्पा घनसरवाड, हदगाव | र.रू.5000/- | र.रू.15000/-(मासिक दर) |
| 2) लक्ष्मण राजाराम घनसरवाड, आंदेगाव | र.रू.6500/- | र.रू.16500/-(मासिक दर) |
| 3) विलास गंगाधर गंदेवाड, हदगाव | र.रू.6800/- | र.रू.16000/-(मासिक दर) |

उपरोक्त निविदापैकी लक्ष्मण यल्लाप्पा घनसरवाड, हदगाव यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे.सदर ठेकेदार यांनी दोन व्यक्ती मार्फत गॅस दाहिनी व पारंपारिक पध्दतीने अंतविधी करणेचे आहेत. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा